# कार्यालय नगर परिषद सावनेर
# ता.सावनेर जि.नागपूर

E-Mail :municipalcouncilsaoner@gmail.com संपर्क :-07113-232217

जावक क्र. नपसा /बांध.वि./1617/2026 दि. 14/05/2026

## ई - निविदा सुचना

मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर जि.नागपूर यांचे वतीने खालील कामाच्या बि-1 दोन लिफाफा पध्दतीच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.खालील कामाची निविदा केवळ ई- निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 15/05/2026 पासून पाहण्यास उपलब्ध आहे.कामाचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | कामाचा कालावधी | निविदा किंमत | निविदेचा प्रकार व कंत्राटदाराची वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | वेळ : प्रथम<br>वैशिट्यपूर्ण योजना , प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना ( PMKKKY) जिल्हा खनिज प्रतिष्ठान,नागपूर अंतर्गत " शिक्षण शिर्ष "<br>प्रभाग क्र.5 मध्ये नगर परिषद हायस्कूल जवळ वाचनालय / अभ्यासिका केंद्र आधुनिक सुविधासह बांधकाम करणे.<br>Construction of "Library, Study Center Building with Modern Facilities Near Municipal Council High | 8,02,46,603/- | 8,02,466/- | 12 महिने | 10,000/- | वर्ग 5 व त्यावरील |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | School in Ward No. 5, Sanner " (FURNITURE WORK) ELECTRICAL,FIRE AND HVAC WORK (G + 2 FLOORS) (Part B+ C) | | | | | |
| 2 | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा योजनेअंतर्गत हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लोककल्याण अभियान राबविणे. प्रभाग क्र.4 नगर परिषद हायस्कूल ची दुरुस्ती करणे. | 60,60,515/- | 60,605/- | 6 महिने | 3,000/- | वर्ग 5 व त्यावरील |
| 3 | प्रभाग क्र.4 महाजन ले – आऊट मधिल राधाकृष्ण मंदिर ओपनस्पेस विकसित करणे. | 50,46,716/- | 50,467/- | 6 महिने | 2,500/- | वर्ग 5 व त्यावरील |

ई - निविदा प्रसिध्दीचा तपशिल

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | दि. 15/05/2026 वेळ सकाळी 09.45 वाजता |
| ई - निविदा पूर्व बैठक स्थळ व दिनांक | स्थळ : कार्यालय नगर परिषद सावनेर<br>दि.18/05/2026 वेळ सकाळी.11.00 वाजता |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड | दि.15/05/2026 ते दि.22/05/2026 सायं.06.15 वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल शेवटचा दिनांक | दि. 22/05/2026 सायं.06.15 वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 25/05/2026 ला 10.00 वाजता (शक्य झाल्यास) |

अटी व शर्ती :-

सदर कार्य " सन 2025 -26 वैशिट्यपूर्ण योजना , प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना ( PMKKKY) जिल्हा खनिज प्रतिष्ठान,नागपूर अंतर्गत " शिक्षण शिर्ष " आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व

सुविधा योजनेअंतर्गत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लोककल्याण अभियान राबविणे. निधीतून घ्यावयाचे असल्यामुळे उपलब्ध असलेल्या निधीनुसारच कंत्राटदारास देयके अदा करण्यात येईल.

1) तांत्रिक लिफाफ्यात खालील अद्ययावत कागदपत्रे सादर करावे.यापैकी एक किंवा अधिक कागदपत्रे अपूर्ण असल्यास निविदा तांत्रिकदृष्टया अपूर्ण समजून अपात्र ठरविण्यात येईल.

1. scanned copy of online payment receipt towards EMD

2. online payment receipt towords cost of document

3. scanned copy of original valid certificate as a registered contractor with the government of Maharashtra

4. scanned from original copy of valid GST registration certificate

5. scanned copy of PAN card allotted by income tax department

6. scanned copy of EPF registration certificate

7. copy of income tax return of last three year from income tax office

8. affidivate regarding completeness correctness and truthfulness of documents submitted on rs 100/- stamp paper as per prescribed proforma sworn before tashil magistrate affidavit / notary

9. affidivate/notary on rs 100/- stamp paper of non-participation of municipal council officers/ staff in the whole tendering procedure (Apendix-A)

10. copy of affidavit/notary (on rs 500 stamp paper) regarding that he is not black listed in any govt./ semi govt./ co-operative sector/ corporations organization.

11. the bidder should have execute any type of civil work again single work oder of value not less 30% of work amount during last 3 years and submit the scanned copy of original satisfactory work completion certificate issue by the concerned authority

12. contractor's average turnover of civil work for last 3 years should be equal to 75% of work amount and should submit scanned copy of original turnover certificate for last 3 years issued by the chartered accountant.

13. list of plants and machinery immediately available with the tenderer or for use in this work

14. list of technical person employed.

15. scanned copy of original invoice and the other necessary documents of Machinery to be used should be attached with ownership/ rental documents (self-loading concrete mixer)

16. the bid capacity of the contractor.

17.valid EPF compliance receipt from the emplyees provident fund organization (EPFO) up to the financial month of MAR 2026

2) कंत्राटदाराला साईटवर नेहमी बांधकाम अभियंता ठेवणे आवश्यक आहे.

3) सिमेंट रोडच्या बांधकामाकरिता स्ट्रीट बीम व्हायब्रेटर तसेच सिमेंट नालीच्या बांधकामाकरिता निड्ल व्हायब्रेटरचा वापर करणे अनिवार्य राहील.

4) सदर कामाकरिता वापरण्यात येणारे कुशल / अकुशल मनुष्यबळास किमान वेतन अधिनियम 1948 (Minimum Wages Ac 1948) अंतर्गत निश्चित केल्याप्रमाणे किमान वेतन देणे कंत्राटदारास / निविदाधारकास बंधनकारक राहील.

5) निविदादरास मंजूरी मिळाल्यास आदेश देण्यापूर्वी 2 टक्के अतिरिक्त सूरक्षा ठेव (Rounded to nest 100.) सूरक्षा ठेव रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील व जेवढे काम केले जाईल तेवढ्यात कामाचे रंनिंग बिल देण्यात येईल.त्यातून 8 टक्के सुरक्षा ठेव म्हणून कपात करण्यात येईल.

6) संबंधीत निविदा धारकांचा लिफाफा क्रमांक 1 व लिफाफा क्रमांक 2 उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या (L1) निविदाधारकाच्या न्युनतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या 10 % पर्यंत दराचा असेल तर त्या निवीदाधारकाने निविदाधीन किमंतीच्या 1 % एवढ्या किंमतीचा धनादेश (Chaque) किवा धनाकर्ष (Demand Draft) अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून आठ दिवसाच्या आत.मा.मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर येथे सादर करावे.कोणत्याही कारणासाठी 8 दिवसाची मुदत शिथीलक्षम राहणार नाही.(उदा.1% ते 10% कमी दर 1 % रक्कम) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे निर्णय शासन दिनांक 26 नोहेंबर,2018 मधील मुद्दा क्रमांक 3 प्रमाणे देकार 15 टक्के पेक्षा अधिकच्या कमी दराचा असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.द्वारे सादर करणे अनिवार्य राहील.उदा.19 टक्के कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथकरण राहील

i)10 टक्के कमी दरापर्यंत 1 टक्के व

ii) 15 टक्के कमी दरापर्यंत (15 टक्के – 10 टक्के = 5 टक्के) तसेच

iii) (19 – 15) = 4 टक्के करिता (4 x 2) = 8 टक्के असे एकूण (1+5+8)=14 टक्के रक्कम संबंधीत निविदा धारकांचा लिफाफा क्र.1 व लिफाफा क्रमांक 2 उघडल्यानंतर प्रथम न्यूनत्म देकार सादर करणा-या L1 निविदाधारकास धनाकर्ष (Demand Draft) अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून आठ दिवसाच्या आत.मा.मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर येथे सादर करावी लागेल सदर बाब उदाहरणा दाखल देण्यात आली असून 19 टक्केच्या वर कमी दराचा देकार सादर केल्यास त्या प्रमाणे डी.डी.सादर करावे लागेल डी.डी. सादर करण्यासाठी कालावधी शिथिलक्षम राहणार नाही.

7) काम सुरू करण्यापूर्वी जागेचे जिओ टॅग फोटो व व्हिडीओ तसेच काम पूर्ण झाल्यानंतर अंतिम कामाचे जिओ टॅग फोटो व व्हिडीओ कार्यालयात सादर केल्याशिवाय देयके अदा केली जाणार नाही.दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करावयास पाहिजे अन्यथा 500/-रुपये प्रति दिवस याप्रमाणे दंड आकारण्याचा अंतिम निर्णय मुख्याधिकारी यांचा राहील.

8) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करावे लागेल अन्यथा योग्य तांत्रिक कारणाशिवाय मुदतवाढ दिली जाणार नाही आणि कंत्राटदाराचे अनामत रक्कम,सूरक्षाठेव रक्कम व अतिरिक्त सूरक्षा ठेव जप्त करण्यात येईल आणि नगर परिषदेचे संपूर्ण झालेले नुकसान कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

9) बांधकामाच्या कामात काही अडथळे आल्यास किंवा इतर कोणत्याही काम पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ घेण्याची गरज निर्माण झाल्यास तसा कारणासहित 7 दिवसापूर्वी अर्ज करावा लागेल व त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांच्याकडे राहील.

10) बांधकाम पूर्ण झाल्यावर त्या जागेवर बांधकाम पूर्ण करण्यात आले असेल तेथील शिलकी सामान,घाण,कचरा इत्यादी साफ केल्याशिवाय अंतिम बिल देण्यात येणार नाही.

11) कंत्राटदार यांनी पारपाडावयाची सर्व कामे स्थापत्य अभियंता,वास्तूविशारद यांच्या निर्देशनानुसार पार पाडण्यात येईल. येतील.

12) कार्यालयाकडून संबंधीत अधिका-यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनाचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

13) सदर कामाचे स्थापत्य अभियंता नगर परिषद सावनेर व मुख्यअधिकारी यांच्याकडून वेळोवेळी परीक्षण केले जाईल.

14) अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरणा करावे अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाही.

15) बांधकामाचे बिलातून नियमाप्रमाणे आयकर,GST, कामगार उपकर, कामगार विमा व इतर शासनाचे कर कपात करण्यात येईल.तसेच याबाबतीत वेळोवेळी प्राप्त शासकीय सूचना प्रमाणे कपाती करण्यात येईल.

16) कंत्राटदारास विनामूल्य कामाचे जागेवर कामाबाबत माहिती व इतर माहितीची सूचना देणार लोखंडी फलक लावणे बंधनकारक राहील.

17) काम सुरु असतांना कोणताही अपघात व वित्त हानी झाल्यास नगर परिषद सावनेर जबाबदार राहणार नाही त्याची पूर्णत: जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

18) कामासंबंधी काही वाद निर्माण झाल्यास त्यांचा निपटारा करण्याचे सर्व अधिकार नगर परिषद सावनेर ला राहील.

19) कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे किंवा स्विकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

20) कामाचे देयक शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या अनुदानानुसार अधिन राहून देयके अदा करण्यात येईल.बाजार दरातील तफावतीनुसार वाढीव दर अनुज्ञेय राहणार नाही (Price escalation) या निविदेची सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके न.प.सूचना फलक वर उपलब्ध राहील.

22) उपरोक्त अटी व शर्ती मान्य न करणाऱ्या कोणत्याही कंत्राटदाराला बांधकामाची निविदा देण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

23) संबंधित कामाकरिता लागणारे गौण खनिजाचे शुल्क शासनास जमा दिल्याचे केल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडावे लागेल. अन्यथा ती रक्कम देयकातून कपात करण्यात येईल

24) विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल व कोणत्याही योग्य तांत्रिक कारणाशिवाय मुदतवाढ देण्यात येणार नाही.

25) निविदाधारकांनी निविदा स्वीकृतीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत शक्यतो निविदा भरण्यास विलंब करू नये. शेवटच्या दिवशी काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास निविदेत मुदतवाढ देता येणार नाही.

26) उपरोक्त कामातील आवश्यक संकल्पन व इतर आवश्यक बाबी सादर करून सक्षम अधिकाऱ्याकडून मंजुरी प्राप्त करून घेणे हि जबाबदारी कंत्राटदाराची असेल. त्याकरिता मुदतवाढ दिली जाणार नाही.

27)त्रयस्थ तांत्रिक लेखा परीक्षण झाल्याशिवाय अंतिम देयक अदा करण्यात येणार नाही.

28)काम अंदाजपत्रकानुसार होत आहे याची खात्री केल्यानंतरच कामाचे धावते देयक कंत्राटदारास अदा केले जाईल धावते देयक देणे नगर परिषद सावनेर ला बंधनकारक राहणार नाही.

29)सी.एस.आर.दराच्या 15 % च्या वरील कमी दराने (Below Rate ) निविदा फार्म मध्ये निविदा दर नमूद केले असल्यास कमी दराबाबत दर पृथकरन (Rate Analysis) निविंदा पुस्तकासोबत सादर करावे लागेल. दर पृथकरन (Rate Analysis) मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार निविदा समिती ला राहील.

30)महा.शासन वित्त विभागाचे शासन परीपत्रक क्रमांक GST/1017/प्र.क्र./81/कराधान – 1 दिनांक 19/08/2017 अन्वये महा.शासन वित्त विभाग शासन परीपत्रक GST/1017/प्र.क्र./155/कराधान – 1दिनांक 1/09/2017 अन्वये तसेच महा.शासन सा.बा.विभाग शासन परीपत्रक क्रमां क 2017/प्र.क्र.121/भाग – 2/इमा -2 दिनांक 19/09/2017 अन्वये दिनांक 01/07/2017 पासून वस्तु व सेवा कर(GST) लागू नियमानुसार कपात करण्यात येईल.याची सर्व कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

31) GST चा भुगतान अंदाजपत्रकीय तरतुदींच्या अधीन राहून करण्यात येईल.

32) अत्यंत महत्त्वाची सूचना निविदा भरतांना कंत्राटदारांनी दस्ताएवज स्वत: साक्षाकित (Self Attested) विहित मुदतीत सादर न केल्यास कोणत्याही परिस्थितीत दस्तावेज स्विकारले जाणार नाही.

33)पात्र कंत्राटदारांना शासन निर्णय क्रमाक : संकीर्ण -2018 /प्र.क्र.151/इमारती- 2 दिनांक 14 जानेवारी 2019 सा.बा.वि.महाराष्ट्र शासन व शासन निर्णय क्रमाक : संकीर्ण -2018 /प्र.क्र.539/नवी-20 दिनांक 08 जून 2018 नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अटी शर्ती लागू तसेच लेखासंहिता 2011 आणि महाराष्ट्र नगर परिषद,नगर परिषदा , अधिनियम 1965 कायद्याचे नियम लागू राहतील.

34) स्थानिक लेखा शाखेकडून लेखा परिक्षण झाल्यानंतर व दोष दायित्व कालावधी पूर्ण झालेनंतर कंत्राटदारास कामाची सूरक्षा ठेव , अनामत रक्कम परत करण्यात येईल.

35)कंत्राटदारांनी स्वत: कामाचे स्थळ निरीक्षण करून आणि अंदाजपत्रकातील बाबी तपासून निविदा दाखल करावी.न.प.कडून कार्यादेश निर्गमित केल्यानंतर कंत्राटदाराने अंदाजपत्रकातील बाबी अन्वये गुणवत्तापूर्ण काम करणेस बंधनकारक राहील

| स्थापत्य अभियंता | लेखापाल | लेखापरिक्षक | मुख्याधिकारी, |
|---|---|---|---|
| नगर परिषद सावनेर. | नगर परिषद सावनेर. | नगर परिषद सावनेर. | नगर परिषद सावनेर. |

Signature Not Verified

Digitally signed by ASHWIN RAMESHWAR CHAVHAN
Date: 2026.05.14 21:50:40 IST
Location: Maharashtra-MH